**नि. मु. क्रं. १३८/२०२४**
**नलिनी वि. प्रमोद**
**निशाणी १६ खाली**

**<u>वादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ नलिनी विठ्ठल शेळक हिची उर्वरित सरतपासणी शपथेवर सुरू</u> — <u>वादीतर्फे विधिज्ञ श्री. एस. व्ही. वालसिंगे यांच्यामार्फत.</u>**

मी माझे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी १६ वर दाखल केले असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मी वाचलेला असुन खरा व बरोबर आहे. तो माझे सांगण्याप्रमाणे लिहिन्यात आलेला आहे. प्रस्तुत दाव्यात मी दस्त यादी निशाणी ३ सोबत अनु. क्र. १ वर नमुद असलेले दि. ०१/०७/२०१० रोजीच्या खरेदी खताची पडताळणी केलेली प्रत आजरोजी मी दाखल केली आहे. सदर खरेदी खतात माझे नांव लिहुन घेणार म्हणुन नमुद असुन त्यावर माझ्या सह्या आहेत. सदर खरेदी खताद्वारे मी वाद मिळकत विठ्ठल श्रीराम शेळके व इतर यांचेकडुन विकत घेतलेली आहे. सदर खरेदी खतातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर खरेदी खताच्या पडताळणी केलेल्या प्रतीस **निशाणी २०** देण्यात येते. मी अभिलेखावर दस्त यादी निशाणी ३ सोबत अनु. क्र. २ व ३ वर अनुक्रमे फेरफार नोंद क्र. ११६ व १२१ च्या प्रमाणीत प्रती दाखल केल्या आहेत. सदर प्रतींना अनुक्रमे **निशाणी २१ व २२** देण्यात येते. मी अभिलेखावर दस्त यादी निशाणी ३ सोबत अनु. क्र. ४ वर वाद मिळकतीचा गांव नमुना क्र. ८ ची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. सदर प्रतीस **निशाणी २३** देण्यात येते. मी अभिलेखावर दस्त यादी निशाणी ३ सोबत अनु. क्र. ५ वर वाद मिळकतीचा गांव नमुना क्र. ७ व १२ ची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. सदर प्रतीस **निशाणी २४** देण्यात येते. मी अभिलेखावर दस्त यादी निशाणी ३ सोबत अनु. क्र. ८ वर प्रतिवादी यास माझे वकिलांमार्फत दि. ०१/०८/२०२४ रोजी दिलेल्या जबाब नोटीसची स्थळप्रत दाखल केली आहे. त्यावर माझी व माझे वकिलांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. सदर जबाब नोटीसच्या स्थळप्रतीस **निशाणी २५** देण्यात येते. मी अभिलेखावर दस्त यादी निशाणी ३ सोबत अनु. क्र. ९ वर निशाणी २५ वरील जबाब नोटीस प्रतिवादीचे वकिल श्री. एस. आर. खोखले यांना पाठवल्याबाबत पोस्टाची पावती मी अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **निशाणी २६** देण्यात येते. सदर जबाब नोटीस प्रतिवादीच्या वकिलांना दि. २९/०८/२०२४ रोजी प्राप्त

झाली होती. मी अभिलेखावर दस्त यादी निशाणी ८ सोबत अनु. क्र. १ वर प्रतिवादीच्या वकिलांनी मला पाठवलेली दि. २३/०७/२०२४ रोजीची नोटीसची छायांकित प्रत दाखल केली आहे. **सरतपास पुर्ण.**

**(उर्वरित सरतपास वादीचे वकिल श्री. एस. व्ही. वालसिंगे यांच्या तोंडी विनंतीवरून पुढील तारखेपावेतो तहकुब)**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. ०४.११.२०२५ (ए.ए. माळी)

अकोट २रे सह दिवाणी न्यायाधीश,

अकोट, ता. अकोट जि. अकोला.